# ऐयार शिरोमणी

# बहिर्जी

डॉ. विजय सावंत



शिवाजी महाराजांच्या सैन्यदलाचे मर्मस्थान त्यांचं गुप्तहेर खातं होतं. या खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक होते. ते उत्तम गुप्तहेर व शूर लढवय्ये होते. बहिर्जी नाईक यांच्या पूर्वेतिहासाबद्दल अधिक माहिती उपलब्ध नाही. त्यांचे गाव, वाडवडील, नाव यांच्या उल्लेखाबाबत इतिहासात मतैक्यरूप नाही. पण बहिर्जी नाईक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबरोबर स्वराज्याच्या सर्व मोहिमांमध्ये गुप्तहेर म्हणून सक्रिय होते याबद्दल साशंकता आढळत नाही.

शिवाजी महाराजांच्या यशाचे, साफल्याचे श्रेय पॉन्डेचेरीचे फ्रेंच गवर्नर मार्टिन यांनी महाराजांच्या गुप्तहेर यंत्रणेला दिले असून त्यांनी शिवाजी महाराजांबद्दल आपले असे मत नोंदवले आहे की ''शिवाजी आपल्या गुप्तहेरांना मुबलक द्रव्य देतो, बिरूदे देतो. अधून-मधून खास पारितोषिके देतो.'' त्यांचे मत महाराजांच्या लष्कराच्या एका महत्त्वाच्या खात्याच्या सक्षम कार्यप्रणालीबाबत आहे.

ऐयार शिरोमणी बहिर्जी | डॉ. विजय सावंत

२०२२

ISBN: 978-81-951158-5-3
नॉटनल: ई–लायब्ररी संगठन,लखनौ : उत्तर प्रदेश




बहिर्जी नाईक यांची भूपाळगड (बानूरगड) येथील समाधी

**प्रा. डॉ. विजय सावंत**

- माजी विभाग प्रमुख, प्राणिशास्त्र, जैव तंत्रज्ञान विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- माजी विभाग प्रमुख, जैव तंत्रज्ञान विभाग, के. आय. टी.,कोल्हापूर
- शरीर विकास व स्निग्ध पदार्थ या विषयात संशोधन.
- संशोधन मार्गदर्शक – एम. एस्सी.,एम.फिल. व पीएच.डी.
- संशोधक प्रकल्प मार्गदर्शक.
- भारतीय व विदेशी संशोधन पत्रिकांमध्ये लेख प्रकाशित.
- पर्यावरणविषयक पुस्तिका प्रकाशित.
- विज्ञानाची अभ्युदय गाथा: ॲलर्जी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रकाशन
- 'एशियाटिक ॲरॅकनिडा' या संस्थेची स्थापना (कै. प्रा. गणेश वानखेडे यांच्यासह) व प्रयोगशाळा मार्गदर्शक पुस्तिका प्रकाशित.
- 'ग्यानबा चित्तेवान' पुस्तक प्रकाशित–सह्याद्री इतिहास संशोधन केंद्र, कोल्हापूर–२०२०

**पुरस्कार :**

- 'उत्कृष्ट प्राध्यापक पुरस्कार': शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 'पर्यावरण' पुरस्कार : युथ हॉस्टेल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य

अनेक सामाजिक, धर्मादाय संस्थांचे सदस्य, आजीवन सदस्य व सामाजिक कार्यात सक्रिय

# ऐयार शिरोमणी बहिर्जी

# डॉ.विजय सावंत

**ऐयार शिरोमणी बहिर्जी**
ISBN: 978-81-951158-5-3

© **डॉ.विजय सावंत**
**भ्रमणध्वनी :** 9371693059
**ई पता:** drvijaysawant7@gmail.com

**प्रकाशक :** नॅाटनल: ई-लायब्ररी संगठन,लखनौ : उत्तर प्रदेश
**ई संस्करण :** २०२२

**मूल्य:** रु.२१०/-
**मुद्रित प्रती :** भारती मुद्रणालय, शाहुपुरी, कोल्हापुर: ४१६००१

ऐयार शिरोमणी बहिर्जी : डॉ. विजय सावंत

# मनोगत

छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचा राज्यकारभार याबद्दल मनात नेहमीच जिज्ञासा राहिली. त्यांच्या यशात त्यांचे अनेक शूर सरदार, साथीदार यांच्या नामावलीत बहिर्जी नाईक हे नाव नेहमी अग्रणी राहिलेले दिसते. शिवाजी महाराजांच्या सैन्यदलाचे मर्मस्थान त्यांचं गुप्तहेर खातं होतं. या खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक होते. ते उत्तम गुप्तहेर व शूर लढवय्ये होते. बहिर्जी नाईक यांच्या पूर्वेतिहासाबद्दल अधिक माहिती उपलब्ध नाही. त्यांचे गाव, वाडवडील, नाव यांच्या उल्लेखाबाबत इतिहासात मतैक्यरुप नाही.पण बहिर्जी नाईक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबरोबर स्वराज्याच्या सर्व मोहिमांमध्ये गुप्तहेर म्हणून सक्रिय होते याबद्दल साशंकता आढळत नाही. शिवाजी महाराजांच्या यशाचे, साफल्याचे श्रेय पॉन्डेचेरीचे फ्रेंच गवर्नर मार्टिन यांनी महाराजांच्या गुप्तहेर यंत्रणेला दिले असून त्यांनी शिवाजी महाराजांबद्दल आपले असे मत नोंदवले आहे की 'शिवाजी आपल्या गुप्तहेरांना मुबलक द्रव्य देतो, बिरुदे देतो. अधून-मधून खास पारितोषिके देतो.' त्यांचे मत महाराजांच्या लष्कराच्या एका महत्त्वाच्या खात्याच्या सक्षम कार्यप्रणालीबाबत आहे. बहिर्जी नाईक, त्यांचे जवळ जवळ तीन हजार वाकबगार शिष्य, महाराजांचे यश हा मराठ्यांचा इतिहास सर्वमान्य होतो. "राजा, राज्य व प्रजा यांची सुरक्षा म्हणजे राजाची गुप्तहेर यंत्रणा. ही सर्वोपरी असते" हे आपण जाणतो. या सूत्रपाताच्या आधारे बहिर्जी नाईक व छत्रपती शिवाजी महाराज यांचे

अद्वैत प्रस्तुत करण्याचा हा प्रयत्न. ‘ऐयार शिरोमणी बहिर्जी’ हा छोटा प्रयत्न वाचकांहाती सुपूर्द करताना आनंद होतो आहे.

मातुश्री जिजाबाई, छत्रपती शिवाजी महाराज, महाराजांचे  हजारो मावळे, अष्टप्रधान मंडळ, महाराजांचे गडकोट, दऱ्या खोरी, नद्या, पर्वत, शाह्या हा इतिहास. या पार्श्वभूमीवर महाराजांचा गुप्तहेर बहिर्जी नाईक शब्दांकित करताना ऐतिहासिक घटनांचा आधार महत्त्वाचा ठरला आहे. चारशे वर्षांपूर्वीचा मुलुख, त्याची भौगोलिक रूपे, तत्कालीन राज्यव्यवस्था, चालीरीती, परंपरा, रूढी, बोली, भाषा, परिमाणं, इतिहासाची पार्श्वभूमी इत्यादी बाबी लक्षात ठेऊन बहिर्जी नाईक हा नायक रेखाटताना कल्पनाविलासाचं स्वातंत्र्य घेतलं आहे.

इतिहासाची आवड अन् ललित साहित्याबद्दलचं प्रेम यातून खूप वाचन झालं. नाथमाधव; वि.वा. हडप; वि. म. भुस्कुटे; गो. नी.दांडेकर; रणजित देसाई; शशि भागवत यांच्याप्रमाणंच इयान फ्लेमिंग; अॅगाथा ख्रिस्ती, एडगर अॅलन पो; सिडने शेल्डन; आयर्विंग वॅलेस, अर्नेस्ट हेमिंग्वे इत्यादी लेखकांच्या साहित्य वाचनामुळं शब्दसमृद्ध होण्यास मदत झाली व अभिव्यक्तिकौशल्याचं संवर्धन झालं. प्राप्त ज्ञानाचं, कौशल्याचं उपयोजनही आत्मसात झालं. त्याची परिणती म्हणजे बहिर्जी नाईक या ऐयारश्रेष्ठासंबंधी ही ललित कृती. बहिर्जींच्या कथेत जे उत्तम असेल ते छत्रपती शिवाजी महाराजांची चरणधूली आहे जी मी मस्तकावर